संस्कृत विभाग

एस. एन. डी .टी. महिला विद्यापीठ

<u>माजी विद्यार्थिनीचे स्नेहसंमेलन</u>

दिनांक १० जानेवारी , २०१४.

दि. १० जानेवारी २०१४ रोजी दुपारी २ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत एस. एन. डी .टी. विद्यापीठाच्या चर्चगेट - मुंबई येथील संस्कृत विभागातील माजी विद्यार्थिनीचे स्नेहसंमेलन संपन्न झाले. खालीलप्रमाणे माजी विद्यार्थिनी हजर होत्या :

1. मिथिला व्यास
2. विमला वर्मा
3. पूर्व मंगरुळकर
4. उज्ज्वला पवार
5. जयश्री खोब्रागडे
6. वर्ष वीरा
7. कोकिला शाह, इत्यादी.

या माजी विद्यार्थिनीच्या संघटनेच्या अध्याशापदी सर्वानुमते सौ. कमलताई अभयंकर व सचिवपदी उज्ज्वला पवार यांची निवड करण्यात आली .

प्रारंभी संस्कृत विभागप्रमुख डॉ. शशी कश्यप यांनी सर्वांचे स्वागत केले व प्रास्ताविक भाषण केले. त्यानंतर त्यांनी संमेलनाची सूत्रे श्रीमती उज्ज्वला पवार यांच्याकडे सुपूर्द केली .

सर्वप्रथम एम. ए. संस्कृत विभागात सध्या शिकत असलेल्या विद्यार्थिनी व अन्य विभागातील विद्यार्थीनिसाठी श्लोकोचार्रण स्पर्धा संपन्न झाली. त्यातील उत्कृष्ट चार विद्यार्थीनिनी बक्षिसे मिळवली . मा. कमलताई अभयंकर काव मा.वीणाताई गोडबोले यांनी या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून काम पहिले.

उज्ज्वला पवार यांनी मग आजी माजी सर्व विद्यार्थिनीचे स्वागत केले व माजी विद्यार्थिनींची संघटना बनवावी ठराविक कालावधीनंतर भेटावे व आपला संस्कृत विभागाचा प्रचार करावा- उन्नयन करण्यासाठी प्रयत्न करावे , सूचना कराव्या असे आवाहन केले.

त्यानंतर सर्व विद्यार्थानिनी आपल्या जुन्या स्मुर्तीना उजाळा दिला . सर्वांना त्यांच्या गुरुजनांचे म्हणजेच सौ. कमलताई अभयंकर, डॉ. शशी कश्यप व इतर गुरुंबद्दल कृतज्ञता व्यक्त केली . तसेच एस. एन. डी .टी. विद्यापीठाचीही ऋण मानले . काही जाणाणी स्वरचित कविता वाचून दाखवल्या. सर्वांनाच त्या वास्तूत आपल्या गुरुजनांना व सहपाठीनिना भेटून गहिवरून आले .

डॉ. जितेंद्र तिवारी यांनी सर्वांचे आभार मानले . अल्पोहारानंतर सर्वांनी भेटण्याची निश्चित केले . अशारीतीने हा सोहळा अत्यंत अनोपाचारीक व ह्रिदय झाला.